**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २०५/२०२५**

नवनाथ वि. इंद्रजित

**निशाणी क्र. १ लगत**

**फिर्यादी पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र.१ याची जबानी**

**शपथेवर प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,**

माझे नाव : सचिता नवनाथ भोसले,

माझे वय : २५ वर्ष, धंदा : घरकाम,

राहणार : भुयार चिंचोली, ता. उमरगा, जि.धाराशिव.

दिनांक २७/१०/२०२५ रोजी सकाळी ०७.०० वाजता माझे वडील पाणी आणण्याकरीता बाहेर गेले होते. त्यावेळेस माझ्या वडीलांचा ओरडण्याचा आवाज मला आला. त्यामुळे मी आणि माझी आई बाहेर आलो. त्यावेळेस आम्ही पाहीले की, इंद्रजित गोरख भोसले, गोरख भोसले, शंकर भोसले व वैजयंती भोसले हे माझ्या वडीलांना मारहाण करीत होते. त्यामुळे मी आणि माझी आई यांनी भांडणाची सोडवासोडव केली आणि माझ्या वडीलांना घरी घेऊन आलो. त्यानंतर आरोपी हे धमकी देत होते की, मी तुम्हाला मारुन टाकतो. त्यानंतर माझे वडील मुरुम पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्याकरीता गेले परंतु पोलीसांनी दखल घेतली नाही. आरोपींनी शेताबद्दलची केस माघारी का घेत नाही याबद्दल माझ्या वडीलांना मारहाण केली. आरोपींना कडक शिक्षा करावी ही माझी विनंती आहे.

साक्षीदार क्र. १

दि. १७.०२.२०२६

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

KAPIL NIVRATTI NIVDANGE

Digitally signed by KAPIL NIVRATTI NIVDANGE
Date: 2026.02.18 17:42:17 +0530

( श्री. के. एन. निवडंगे )

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,

न्यायालय, क्र.२ उमरगा

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २०५/२०२५**

नवनाथ वि. इंद्रजित

**निशाणी क्र. १ लगत**

**फिर्यादी पक्षातर्फे फिर्यादी साक्षीदार क्र.२ याची जबानी**

**शपथेवर प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,**

माझे नाव : चित्रा नवनाथ भोसले,

माझे वय : ५० वर्ष, धंदा : घरकाम,

राहणार : भुयार चिंचोली, ता. उमरगा, जि.धाराशिव.

घटना ही गेल्या वर्षी दिवाळीच्या वेळी घडली. त्यावेळी माझी पती पाणी आणण्याकरीता बाहेर गेले होते. त्यावेळी शंकर भोसले, गोरख भोसले, वैजयंता भोसले व इंद्रजित भोसले यांनी माझ्या पतीला मारहाण केली. माझ्या पतीचा आवाज आल्यानंतर मी व माझी मुलगी सचिता बाहेर आलो व भांडण बघीतल्यानंतर भांडणाची सोडवासोडव केली व माझ्या पतीला घरी घेऊन आलो. आरोपींनी आम्हाला धमकी दिली की, तुम्हाला जिवे मारुन टाकतो. आरोपींनी माझ्या पतीला केस माघारी का घेत नाही यामुळे मारहाण केली. आरोपींना कडक शिक्षा करावी ही माझी विनंती आहे.

साक्षीदार क्र. २

दि. १७.०२.२०२६

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

KAPIL NIVRATTI NIVDANGE

Digitally signed by KAPIL NIVRATTI NIVDANGE
Date: 2026.02.18 17:42:28 +0530

( श्री. के. एन. निवडंगे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय, क्र.२ उमरगा